# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**

(Formerly University of Pune)

**परीक्षा समन्वय कक्ष**
परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
**दूरध्वनी क्र.:** ०२०-२५६२१४४०
**ई-मेल आयडी:**
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
**संकेतस्थळ :** www.unipune.ac.in

**Exam Co-ordination Section**
Examination Department
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

**संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/१४२२** **दिनांक: १६/१०/२०२६**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक व महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा-नगर हवेली)

**विषय:** हिवाळी सत्र २०२६ च्या परीक्षा केंद्राबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व प्राप्त आदेशान्वये आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५—२६ उन्हाळी सत्र परीक्षांपर्यंत परीक्षा केंद्र म्हणून मान्यता देण्यात आलेली होती अशा परीक्षा केंद्राची मान्यता नेमलेल्या लेखापरीक्षणच्या समितीच्या निर्णयाच्या आधिन राहून हिवाळी २०२६ करिता तात्पुरत्या स्वरूपात मान्यता देण्यात येत आहे. लेखापरीक्षण अहवाल व परीक्षा विभागाकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीनुसार अशा केंद्र मान्यतेत बदल होऊ शकतो व याच सत्रापासून प्रभावी असेल.

२. जे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये नविन सुरू झालेले आहेत व त्यांना परीक्षा केंद्र म्हणून मंजूर करण्यात आलेले नाही व त्यांच्या परीक्षा मागील उन्हाळी सत्र परीक्षा २०२६ मध्ये ज्या केंद्रावर घेण्यात आल्या होत्या त्याच परीक्षा केंद्रांना हिवाळी सत्र २०२६ करिता तात्पुरत्या स्वरूपात मान्यता देण्यात येत आहे.

३. तसेच जे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये सुरू झालेली आहेत त्यांच्या परीक्षा केंद्रासाठी स्वतंत्रपणे परिपत्रक निर्गामित करण्यात येईल.

४. आपणास असेही कळविण्यात येते की, सिनर्जी स्कूल ऑफ कॉमर्स, सदाशिव पेठ या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र कायमस्वरूपी बंद करण्यात आले असून या महाविद्यालयातील अनुशेष असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र समाजभूषन, बाबूराव उर्फ आप्पासाहेब जेधे महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे येथे तात्पुरत्या स्वरूपात वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. अश्वमेध कला व वाणिज्य महाविद्यालय, सावेडी, अहिल्यानगर या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र कायमस्वरूपी बंद करण्यात आले असून त्या महाविद्यालयातील अनुशेष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्र म्हणून डॉ. एन.जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वसंत टेकडी, सावेडी, अहिल्यानगर, येथे परीक्षा केंद्र म्हणून तात्पुरत्या स्वरूपात मान्यता देण्यात येत आहे.

कळावे,

प्रा.(डॉ.) राजेंद्र तळवारे
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**